**FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED**

(A Government of Maharashtra Enterprise)

क्रमांक : प्रशा/आस्था-१/प्र.क्र.३८३/न.क्र.४८६/ 1079

दिनांक 17 JUN 2025

## आदेश

विषयः वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गातील स्थानांतरण व पदस्थापना.

संदर्भः- १) या कार्यालयाचे आदेश क्र. प्रशा/आस्था-१/प्र.क्र.३८३/न.क्र.४८६/५०१, दिनांक ०९/०५/२०२५

२) श्री वाय.आर.खोडणकर यांचे दिनांक ०९/०५/२०२५ व १३/५/२०२५ रोजीचे निवेदन.

३) या कार्यालयाचे पत्र क्र. प्रशा/आस्था-१/प्र.क्र.३८३/न.क्र.४८६/६१५, दि. १५/०५/२०२५

४) श्री वाय.आर.खोडणकर यांचे दिनांक १३/०६/२०२५ रोजीचे निवेदन.

संदर्भ क्रमांक १ च्या आदेशान्वये वनपरिक्षेत्र अधिकारी या संवर्गातील नियतकालिक स्थानांतरणाबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यानुसार श्री वाय.आर.खोडणकर, वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे स्थानांतरण वनपरिक्षेत्र अधिकारी, दक्षिण उमरेड, वन प्रकल्प विभाग, नागपूर या पदावरुन झरी परिक्षेत्र, वन प्रकल्प विभाग, नाशिक या रिक्त पदावर करण्यात आले होते.

२.० श्री वाय.आर.खोडणकर, वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी त्यांचे संदर्भिय क्र.२ मधील निवेदनांद्वारे त्यांच्या वैयक्तिक व कौटूंबिक अडचणी विचारात घेता त्यांची पदस्थापना नागपूर जिल्हयांतर्गत करण्याबाबत विनंती केली होती. त्याच निवेदनाद्वारे त्यांनी निदर्शनास आणले होते की, त्यावेळी त्यांची प्रकृती बरी नसल्याने वैद्यकीय अधिकारी यांनी, त्यांना विश्रांतीचा सल्ला दिला आहे.

३.० श्री वाय.आर.खोडणकर, वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या उक्त निवेदनांचा विचार करुन उपरोक्त वैद्यकीय सल्ल्यानुसार विश्रांती घेवून त्यांची प्रकृती बरी झाल्यानंतर या कार्यालयास रुजू होण्याबाबत निर्देश संदर्भ क्र. ३ अन्वये देण्यात आले होते.

४.० श्री वाय.आर.खोडणकर, वनपरिक्षेत्र अधिकारी हे दिनांक १३/०६/२०२५ रोजी या कार्यालयास रुजू झाले असून संदर्भ क्र. ४ अन्वये त्यांच्या विविध वैयक्तिक व कौटूंबिक अडचणीचा पुन्हा उल्लेख केला आहे.

५.० दरम्यान, शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एफडीसी-२०२२/प्र.क्र.१४१/फ-५,दिनांक ०९/०६/२०२५ अन्वये एफडीसीएम करीता पदांचा नविन आकृतीबंध मंजूर झाला असून त्यानुसार आता नाशिक वन प्रकल्प विभागात वनपरिक्षेत्र अधिकारी या संवर्गात रिक्त पदे उपलब्ध नसल्याने श्री वाय.आर.खोडणकर यांच्या बाबतीत संदर्भ क्र. १ मधील आदेशात अंशतः बदल करणे क्रमप्राप्त ठरते

६.० वनपरिक्षेत्र अधिकारी हा संवर्ग राज्य स्तरीय संवर्ग असून श्री वाय.आर.खोडणकर, वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या एफडीसीएम मध्ये आतापर्यंत जवळपास झालेल्या १७ वर्षाच्या सेवापैकी तब्बल ९ वर्षाची सेवा एकटया नागपूर वन प्रकल्प विभागातच झाली असल्याने त्यांची पदस्थाना पुन्हा नागपूर येथे करणे प्रशासकीय दृष्टया योग्य ठरत नाही. मात्र त्यांनी त्यांच्या उपरोक्त निवदेनांद्वारे कळविलेल्या विविध अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करता संदर्भ क्र.१ च्या आदेशात अंशतः बदल करुन त्यांची पदस्थापना नागपूर प्रदेशांतर्गत यवतमाळ वन प्रकल्प विभागातील लालखेड वनपरिक्षेत्र या रिक्त पदावर करण्यात येत आहे.

७.० या कार्यालयाकडील आदेश क्र.प्रशा/आस्था-१/वै.न./प्र.क्र.४३/१०५८, दिनांक १६/०६/२०२५ अन्वये श्री वाय.आर.खोडनकर यांचा दिनांक १०/०५/२०२५ ते १२/०६/२०२५ हा कालावधी वैद्यकीय कारणास्तव परावर्तित रजा म्हणून मंजूर करण्यात आला आहे. तसेच ते दिनांक १३/०६/२०२५ रोजी या कार्यालयात हजर झाले आहेत. सबब उपरोक्त रजा कालावधी व त्यापुढील कालावधीसाठी नियमानुसार त्यांचे वेतन विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, यवतमाळ यांचे कार्यालयाकडून अदा केले जातील.

17/06/2025

(संजीव गौड)
**व्यवस्थापकीय संचालक**

प्रति,
श्री योगेश रामचंद्र खोडणकर, वनपरिक्षेत्र अधिकारी,
१२५, पापूलर सोसायटी वाडीनाका-१०
अमरावती रोड, नागपूर- २३

**प्रतिलिपीः- माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.**

१) महाव्यवस्थापक, एफडीसीएम लि., नागपूर प्रदेश, नागपूर
२) प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक प्रदेश, नाशिक
३) विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, नागपूर
४) विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, यवतमाळ
५) विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, नाशिक
६) आदेश फाईल
७) एफडीसीएम संकेत स्थळ www.fdcm.co.in